# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः06.05.2025** **वारःमंगळवार**

---

1. भारत-पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर उद्या मॉक ड्रिल करण्याचे केंद्रीय गृह मंत्रालयाचे सर्व राज्यांना निर्देश
2. पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी भारतानं अडवलं
3. रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याकडून पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा निषेध
4. आंतरराष्ट्रीय विमान कंपन्याकडून पाकिस्तानच्या हवाई हद्दीमधून उड्डाणे बंद आणि
5. देशात बहुतांश भागात मुसळधार पाऊस, जोरदार वारे, आणि गारपीटीची शक्यता.

**<u>मॉक ड्रिल</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तानमधील तणावाच्या पार्श्वभूमीवर युद्धजन्य परिस्थितीची शक्यता गृहीत धरून सुसज्ज राहण्याच्या उद्देशानं केंद्रीय गृह मंत्रालयानं सर्व राज्यांना उद्या म्हणजे सात मे रोजी, मॉक ड्रिल म्हणजेच युद्ध सज्जता सराव करण्याचे आदेश दिले आहेत. हवाई हल्ल्याच्या वेळी वाजवला जाणारा सायरन वाजविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. हवाई हल्ला होण्याची शक्यता गृहीत धरून हा सराव करण्यात यावा, तसंच नागरी सुरक्षिततेचं महत्त्व लक्षात घेऊन विद्यार्थीवर्गासह नागरिकांना सुरक्षिततेचं प्रशिक्षण द्यावं, असंही गृहमंत्रालयानं या आदेशामध्ये म्हटलं आहे.

**<u>बागलिहार</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर चिनाब नदीवरील बागलिहार धरणातून पाकिस्तानला जाणारं पाणी अडवण्याचा निर्णय भारतानं घेतला आहे. सलाल धरणाचे दरवाजेही बंद करण्यात आले असून झेलम नदीवरल्या किशनगंगा धरणाचं पाणी रोखण्याचा विचारही भारत करत आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानसोबतचा सिंधु पाणी वाटप करार रद्द करण्याचा निर्णय घेतला होता. निम्या पाकिस्तानचं भरणपोषण या पाण्यावर होतं. बागलिहार धरणावरून भारत आणि पाकिस्तानमध्ये गेल्या अनेक वर्षापासून वाद आहे.

**<u>चर्चा</u>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर भारत आणि पाकिस्तान यांच्यातल्या वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि इतर नेत्यांच्या विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरील नेत्याबरोबरच्या बैठकींना वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवी दिल्ली इथं संरक्षण सचिव राजेशकुमार यांच्याशी चर्चा केली. पंतप्रधानांनी गेल्या दोन दिवसांत तिन्ही सेनादलांच्या प्रमुखांशी वैयक्तिक चर्चा केली.

**<u>पुतीन</u>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांनी काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी दूरध्वनीवरुन संवाद साधला. यावेळी त्यांनी पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा तीव्र शब्दांत निषेध केला आणि भारताच्या दहशतवादविरोधी लढ्याला रशियाचा संपूर्ण पाठिंबा असल्याचं सांगितलं. यावेळ दोन्ही नेत्यांनी भारत आणि रशिया यांच्यातली विशेष धोरणात्मक

भागीदारी अधिक मजबूत करण्यासाठीची बांधिलकी व्यक्त केल्याचं परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. दरम्यान मोदी यांनी रशियाच्या विजय दिनाच्या 80 व्या वर्धापन दिनानिमित्त पुतिन यांना शुभेच्छा दिल्या तसच वर्षाच्या अखेरीस भारतात होणाऱ्या वार्षिक शिखर परिषदेसाठी त्यांना आमंत्रित केले.

**<u>राजनाथ</u>**

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह आणि जपानचे संरक्षणमंत्री जनरल नाकातानी यांच्यात नवी दिल्ली इथं काल द्विपक्षीय बैठक झाली. या बैठकीत जनरल नाकातानी यांनी पहलगाम हल्ल्याचा निषेध केला, तसंच भारताला संपूर्ण पाठिंबा व्यक्त केला. दोन्ही देशांच्या संरक्षण आणि सुरक्षा यंत्रणांचा आढावादेखील या बैठकीत घेण्यात आला. तसच द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यावर उभय नेत्यांमध्ये सहमती झाली. भारत आणि जपान यांच्यातल्या वाढत्या संरक्षण सरावावर समाधान व्यक्त करत सागरी क्षेत्रातल्या सहकार्यावर भर देण्याचं यावेळी निश्चित करण्यात आलं. बैठकीआधी नाकातानी यांना तिन्ही सेवा दलांकडून गार्ड ऑफ ऑनर देण्यात आला. तसंच त्यांनी राष्ट्रीय युद्ध स्मारकाला भेट देऊन शहीद जवानांना आदरांजली वाहिली.

**<u>जयशंकर</u>**

परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी काल जपानच्या प्रतिनिधी सभेचे अध्यक्ष फुकुशिरो नुकागा यांची भेट घेतली. यावेळी भारत आणि जपान यांच्यात बौद्धिक संपदेचं आदानप्रदान, व्यापार संबंध आणि तंत्रज्ञानविषयक भागीदारी वाढवण्यावर सहमती झाली.

**<u>हवाई उड्डाण</u>**

एअर फ्रान्स आणि लुफ्थांसा यासारख्या आघाडीच्या जागतिक विमान कंपन्यांनी सुरक्षेच्या कारणास्तव पाकिस्तानी हवाई हद्दीवरून उड्डाण करणे थांबवले आहे. संभाव्य धोका टाळण्यासाठी लांब पल्ल्याच्या मार्गांचा वापर केला जात आहेत. स्विस इंटरनॅशनल एअर लाइन्स आणि एमिरेट्स या विमान कंपन्यादेखील पाकिस्तानी हवाई हद्दीतून उड्डाणे बंद करत आहेत.

**<u>सीबीआय</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली काल सीबीआय संचालकांच्या नियुक्ती समितीची बैठक पार पडली. नवी दिल्लीतील पंतप्रधान कार्यालयात झालेल्या या बैठकीला सरन्यायाधीश संजीव खन्ना आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते. विद्यमान संचालक प्रवीण सूद यांचा कार्यकाळ येत्या 25 मे रोजी संपत आहे. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली लोकसभेतील विरोधी पक्षनेते आणि सरन्यायाधीश यांचा समावेश असलेली त्रिसदस्यीय समिती यासाठी नियुक्त करण्यात आलेली असून त्यांच्या शिफारशीनुसार ही नियुक्ती करण्यात येते.

**<u>सीतारामन</u>**

अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल आशियाई विकास बँकेच्या 58 व्या वार्षिक बैठकीत इटलीमधील मिलान इथं बँकेचे अध्यक्ष मसातो कांडा यांची भेट घेतली. भारत आर्थिक विकासावर लक्ष केंद्रीत करत असून व्यापाराच्या सुलभीकरणासाठी अनुकूल धोरण राबवून नियामक परिसंस्था विकसित करत आहे. या उपक्रमांमध्ये कॉर्पोरेट दर कपात, जीएसटी अंमलबजावणी, स्टार्टअप इंडिया यांचा समावेश होत असल्याचं सीतारामन यांनी या बैठकीत सांगितलं.

**<u>एमआयजीएम</u>**

भारतीय नौदल आणि संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं संपूर्ण स्वदेशी बनावटीच्या आणि विकसित मल्टी इन्फ्लुएंस ग्राउंड माइन अर्थात एमआयजीएमची लढाऊ चाचणी काल यशस्वीरित्या पार पाडली. या यशाबद्दल

संरक्षणमंत्री राजनाथसिंह यांनी डीआरडीओ, भारतीय नौदल आणि उद्योगजगताचं कौतुक केले आहे. या प्रणालीमुळे भारतीय नौदलाची समुद्राखालील युद्धक्षमता आणखी वाढेल असं ते म्हणाले. पाण्याखाली प्रतिकार करणारी ही प्रगत नौदल लढाऊ प्रणाली असून भारतीय नौदलाची क्षमता वाढविण्यासाठी ही यंत्रणा तयार करण्यात आली आहे. सागरी जहाजांद्वारे निर्माण होणाऱ्या ध्वनिक, चुंबकीय, दाब अशा प्रभावांच्या नोंदीसाठी ही प्रणाली अनेक सेन्सर्सने सुसज्ज आहे.

**<u>वक्फ याचिका</u>**

वक्फ सुधारणा कायदा 2025 च्या घटनात्मक वैधतेला आव्हान देणाऱ्या याचिकांवर आता येत्या 15 मे रोजी सर्वोच्च न्यायालयात सुनावणी होणार आहे. सरन्यायाधीश न्यायमूर्ती संजीव खन्ना यांच्यासह न्यायमूर्ती संजय कुमार आणि न्यायमूर्ती के. व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठासमोर काल या याचिकांची सुनावणी होणार होती. मात्र आपण लवकरच सेवानिवृत्त होणार असल्यानं ही सुनावणी पुढील सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या पीठासमोर होईल, असं न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी म्हटलं आहे. यापूर्वी झालेल्या सुनावणीनंतर केंद्र सरकारनं या कायद्यातल्या काही तरतुदींना स्थगिती दिली आहे.

**<u>लोकलेखा</u>**

लोकलेखा समितीची काल पुनर्रचना करण्यात आली. या समितीच्या अध्यक्षपदी काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांची नियुक्ती करण्यात आली असून समितीचा कार्यकाळ 30 एप्रिल 2026 पर्यंत राहील. या समितीमार्फत नियंत्रक आणि महालेखापालांच्या आहवालांचं परीक्षण तसंच सरकारी योजना आणि खर्चाचा अभ्यास केला जातो.

**<u>संकेतस्थळ</u>**

पाकिस्तानी सायबर गुन्हेगारांनी भारतीय लष्कराचं संकेतस्थळ हॅक अर्थात लक्ष्य केल्याची माहिती लष्करी सूत्रांनी काल दिली. पाकिस्तानी हॅकर्सनी भारताच्या लष्करी अभियांत्रिकी सेवा आणि मनोहर पर्रीकर संरक्षण अध्ययन आणि विश्लेषण संस्थेमधली संवेदनशील माहिती तसच संरक्षण क्षेत्रातल्या अधिकाऱ्यांचा वैयक्तिक तपशील आणि त्यांचे वेबसाईट लॉग इनचे तपशील हॅक केले असावेत, असाही अंदाज आहे.

**<u>अपघात</u>**

बिहारमध्ये, कटिहार जिल्ह्यात मोटार आणि ट्रॅक्टरच्या अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला आहे तर दोन जण जखमी झाले. मोटारमधील सर्व मृत एका लग्न समारंभातून परत येत होते.

**<u>आयपीएल</u>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेतील दिल्ली कॅपिटल्स आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यातील सामना काल पावसामुळे रद्द करण्यात आला. दोन्ही संघांना एक-एक गुण मिळाला. सनरायझर्स हैदराबादचा संघ स्पर्धेतून बाहेर पडला आहे. आज वानखेडे मैदानावर मुंबई इंडियन्सचा सामना गुजरात टायटन्सशी  होणार आहे.

**<u>खेलो इंडिया</u>**

बिहारमध्ये सुरू असलेल्या सातव्या खेलो इंडिया क्रीडा स्पर्धेत जलतरणात आदिती हेगडे हिने सुवर्णपदक पटकावत महाराष्ट्रासाठी पदकांचं खातं उघडलं. जलतरण क्रीडा प्रकारात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी एक सुवर्ण एक रौप्य आणि पाच कास्य अशी सात पदकं मिळवली. तिरंदाजीत महाराष्ट्राचे सात खेळाडू पदकासाठी लढणार आहेत. मल्लखांबमध्येही सांघिक प्रकारात मुलांनी आघाडी घेतली आहे. खो-खोमध्ये पंजाबचा 58 विरुद्ध 9 असा पराभव करत

महाराष्ट्राच्या मुलींनी विजयी सलामी दिली. या स्पर्धेत कर्नाटक चार सुवर्ण आणि पाच रौप्य पदकांसह पदकतालिकेत पहिल्या, दिल्ली दोन सुवर्णपदकांसह दुसऱ्या आणि राजस्थान तिसऱ्या स्थानावर आहे.

**हवामान**

गुजरात, आंध्र प्रदेश, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, सौराष्ट्र, कच्छ, तामिळनाडू, पुद्दुचेरी, उत्तराखंड आणि पश्चिम राजस्थानमध्ये आज मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान खात्याने वर्तवली आहे. पुढील 2 ते 3 दिवसांत दिल्ली, महाराष्ट्र, ओडिशा, पंजाब, तामिळनाडू, पुद्दुचेरी, तेलंगणा, विदर्भ, पश्चिम बंगाल आणि सिक्कीममध्ये वादळे आणि जोरदार वारे वाहण्याची शक्यता आहे. तर पूर्व मध्य प्रदेश, मध्य महाराष्ट्र आणि उत्तराखंडमध्ये गारपीट होण्याची शक्यता आहे. येत्या २ दिवसांत राजस्थानमध्ये धुळीचे वादळ येण्याची शक्यता विभागाने वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं, नमस्कार.